# परिसरातील जनतेला माहिती देणे हे विद्यार्थ्यांचे कर्तव्य

- श्री दिनेश चव्हाण

(28.07.2019) परिसरातील जनतेला माहिती देणे हे विद्यार्थ्यांचे कर्तव्य असून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांने परिसतातील किमान एका कुटूंबाची जबाबदारी स्वीकारावी असे आवाहन युवा माहिती दूत उपक्रमांतर्गत व्याख्यानातून आयोजन लोकराज्य महा अभियानाचे प्रमुख श्री दिनेश चव्हाण यांनी दि 28 जुलै 2019 रोजी महाविद्यालयात केले

कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय बोदवड येथे राष्ट्रीय सेवा योजना विभाग व अनुलोम या स्वयंसेवी संस्थेच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयात विविध शाखांमध्ये शिक्षण घेणाऱ्या युवकांनी शासकीय योजनांची माहिती प्रस्तावित लाभार्थ्यांपर्यंत कशी द्यावी या बद्दलची सविस्तर माहिती अनुगामी लोकराज्य महा अभियान या संस्थेचे जनसेवक म्हणून काम करणारे श्री. दिनेश दलपत चव्हाण यांनी उपस्थितांना दिली.

सदर कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य अरविंद चौधरी यांचे मार्गदर्शन लाभले व उपप्राचार्य प्रा. डी. एस. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम यशस्वीपणे संपन्न झाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक कु. जागृती गवारे हिने केले सूत्रसंचालन कु.काजल पाटील व कु.वैशाली माळी हिने आभार मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी रा से यो कार्यक्रम अधिकारी डॉ. चेतनकुमार शर्मा, प्रा. कांचन दमाडे, प्रा.नितेश सावदेकर व सर्व स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.







